महसूली संवर्ग बदलून पदस्थापना देणेबाबत -
निरीक्षक (गट-ब), राज्य उत्पादन शुल्क.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांक :- इएसटी-१२२३/प्र.क्र.१६१/राउशु-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १० जुलै, २०२३.

वाचा :- १) शासन आदेश, क्र.इएसटी-१७१९/प्र.क्र.१५७/राउशु-१, दि.१४.१२.२०२०.
२) महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१.

शासन आदेश-

उक्त वाचा येथील अ.क्र.१ येथील आदेशान्वये, सन २०१९-२० च्या पदोन्नतीसूचीतून श्री.लिलाधर वसंत पाटील यांना निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब या पदावर पदोन्नती देण्यात येऊन, पदोन्नतीनंतर त्यांना औरंगाबाद महसूली विभाग वाटप करुन, निरीक्षक, विभागीय भरारी पथक, जिल्हा-औरंगाबाद या पदावर पदस्थापना केली आहे.

२. श्री.लिलाधर वसंत पाटील, निरीक्षक, राउशु यांनी महसूली विभाग बदलून देण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतुदीनुसार, त्यांना "औरंगाबाद" ऐवजी "नाशिक" हा महसूली विभाग वाटप करण्यात येत असून, सुधारीत वाटप महसूली विभागात, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, त्यांची पदस्थापना खालील स्तंभ (५) मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	दि.१४.१२.२०२० च्या आदेशान्वये वाटप महसूली विभाग व पद	सुधारीत वाटप महसूल विभाग	नवीन पदस्थापना
१	२	३	४	५
१	श्री.लिलाधर वसंत पाटील	**औरंगाबाद** निरीक्षक, विभागीय भरारी पथक, औरंगाबाद.	**नाशिक**	जळगाव शहर (रिक्त जागी)

२. महसूली विभाग बदल हा संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीनुसार करण्यात येत असल्याने, त्यांना पदग्रहण अवधी व बदली भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०७१०१७२८२९८८२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YUVRAJ BAYAJI AJETRAO

Digitally signed by YUVRAJ BAYAJI AJETRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=a34e563dd43e83b04db3eb31230d59c1af4b6e29ee6c1f13e338b0ccd51689af, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C01C962D08BD39997D4C4D6E7E19F8ACF340D1A5C4DD2B9A00977369607BBF82, cn=YUVRAJ BAYAJI AJETRAO
Date: 2023.07.10 17:30:23 +05'30'

(युवराज अजेटराव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. मंत्री, राज्य उत्पादन शुल्क यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) अपर मुख्य सचिव, राज्य उत्पादन शुल्क यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

४) महालेखापाल-१ /२(लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
५) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
७) संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
८) संबंधित निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
९) निवडनस्ती (राउशु-१).